follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

RNI Regd No.७२१०५/९९ * वर्ष २६ * अंक ३१२ सातारा : * रविवार दि.११ ऑगस्ट २०२४ * पाने ८ * किंमत ५ रू/

# ठाकरे गटाचा मेळावा संपताच उद्धव ठाकरेंना 'जोर का झटका'

## शिवसेनेच्या वाघिणीचा शिंदे गटात प्रवेश

**मुंबई :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांचा ठाण्यात मेळावा पार पाडला. या मेळाव्यात मोठा राडा पाहायला मिळाला. उद्धव ठाकरे यांच्या ताफ्यावर मनसैनिकांनी नारळ आणि शेण फेकले. त्यानंतर मेळाव्याच्या ठिकाणी मनसे आणि ठाकरे गटाचे कार्यकर्ते एकमेकांना भिडल्याचं पाहायला मिळालं. आता हा मेळावा संपल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंना जोर का झटका दिला आहे. ठाकरे गटाच्या उपनेत्या आणि गुरुवर्य स्वर्गीय आनंद दिघे यांच्या मार्गदर्शनाखाली घडलेल्या कट्टर शिवसैनिक अनिताताई बिर्जे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला.

ठाण्यातील गडकरी रंगायतन या ठिकाणी ठाकरे गटाचा मेळावा संपताच अनिता बिर्जे यांनी आनंदआश्रमात येऊन शिंदे गटात जाहीर प्रवेश केला. यावेळी एकनाथ शिंदे यांनी त्यांचे पक्षात स्वागत करत त्यांना त्यांच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. शिवसेनेच्या जडणघडणीच्या कालखंडात अनिताताई बिर्जे यांनी तत्कालीन शिवसैनिकांच्या साथीने शिवसेनेची महिला आघाडी तळागाळात पोहचवली होती.

ठाकरे गटाची ठाण्यात वाताहत

'धर्मवीर- मुक्काम पोस्ट ठाणे' या सिनेमातही अनिता बिर्जे यांनी पक्षासाठी केलेले कार्य ठळकपणे दाखवण्यात आले होते. एकनाथ शिंदे यांनी बंड केल्यानंतर पुन्हा सत्तास्थापना केली, तेव्हा अनिता बिर्जे यांनी या निर्णयाला ठाम विरोध केला. त्यावेळी त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यासोबत राहणे पसंत केले होते. यानंतर त्यांच्यावर ठाकरे गटाच्या उपनेतेपदी नियुक्ती करण्यात आली होती. मात्र गेल्या लोकसभा निवडणुकीत ज्या पद्धतीने ठाकरे गटाची ठाण्यात वाताहत झाली ती पाहता ठाण्यातील अनेक पदाधिकारी नाराज आहेत.

अनिता बिर्जे यांनी शिंदे गटात प्रवेश केल्यानंतर ठाकरे गट सोडण्यामागचे कारण सांगितले. एकनाथ शिंदे हेच स्वर्गीय दिघे साहेबांना अभिप्रेत असलेला जनसेवेचा वारसा पुढे चालवत आहेत. हे पटल्यामुळेच त्यांनी आपण शिवसेनेमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली हे सरकार सर्वसामान्य लोकांना न्याय देण्यासाठी काम करत असून ते मला पटलं आहे. त्यामुळे मी त्यांच्यासोबत जाण्याचा निर्णय घेतला, असे अनिता बिर्जे यांनी म्हटलं.

अनिता बिर्जे यांच्या शिवसेना प्रवेशामुळे स्वर्गीय आनंद दिघे यांच्या विचारांवर चालणाऱ्या शिवसेनेला



नवीन बळ मिळाले आहे. शिवसेनेची वाघीण पुन्हा एकदा पक्षात सक्रिय होत असल्याचा आनंद आहे, असे मत एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केले. बिर्जेबाईंच्या आजवरच्या अनुभवाचा फायदा आगामी काळात पक्षाला नक्की होईल. ठाणे जिल्ह्यातील शिवसेना महिला आघाडी अधिक मजबूत होऊन जोमाने काम करेल, अशी अपेक्षा यावेळी एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली.

## वरळी हिट अँड रन प्रकरणी आरोपी मिहिर शाहाचा ब्लड रिपोर्ट समोर

**मुंबई :** गेल्या महिन्यात मुंबईतील वरळी परिसरात घडलेल्या हिट अँड रन प्रकरणी एक महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. वरळी हिट अँड रन केसमधील मुख्य आरोपी असलेल्या मिहीर शाहाची ब्लड टेस्ट निगेटिव्ह आली आहे. मिहीर शाहाच्या वैद्यकीय तपासणीतील रक्ताच्या नमुन्यात अल्कोहोल सापडले नाही. त्यामुळे पोलिसांना मोठा झटका बसला आहे. वरळीतील हिट अँड रन प्रकरणी कारचालकाच्या धडकमुळे एका महिलेला जीव गमवावा लागला होता. तर तिचा पती गंभीर जखमी झाला होता.

मुंबईतील वरळी भागात ९ जुलै रोजी भरधाव बीएमडब्ल्यू कारने धडक दिल्यामुळे महिलेला प्राण गमवावे लागले होते. या कारने दुचाकीवर असलेल्या नाखवा दाम्पत्याला उडवले. त्यानंतर जखमी झालेल्या कावेरी नाखवा यांना गाडीने काही अंतरापर्यंत फरफटत नेले होते. या घटनेत त्यांचा मृत्यू झाला होता, तर त्यांचे पती जखमी झाले होते. वरळीत अपघात झालेली ती बीएमडब्ल्यू कार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या उपनेते असलेल्या राजेश शाह यांची होती. अपघातावेळी शाह यांचा मुलगा मिहिर शाह दारु पिऊन कार चालवत होता.

ही दुर्घटना घडल्यानंतर तीन दिवस मिहिर शाह फरार होता. मिहिर शाहने स्वत: चा आणि मित्राचा मोबाईल बंद ठेवला होता. तसेच तो पालघर आणि बोरिवलीच्या एका मित्राच्या फोनवरून अनेकांशी संवाद साधत होता.

## बच्चू कडू महाविकास आघाडीत जाणार; शरद पवारांच्या भेटीमागचे कारण काय?

**पुणे :** प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते आमदार बच्चू कडू गेल्या काही दिवसांपासून नाराजी असल्याच्या चर्चा आहेत. शुक्रवारी (ऑगस्ट) तर त्यांनी आक्रोश मोर्चा' च्या माध्यमातून राज्यातील शेतकरी, दिव्यांग, प्रकल्पग्रस्त, कामगारांच्या विविध मागण्या निवेदनाद्वारे सरकारपुढे मांडल्या. ५ सप्टेंबर पर्यंत मागण्या मान्य न झाल्यास महायुतीतून बाहेर पडण्याचाही इशारा दिला. त्यानंतर आज ते पुण्यातील मोदी बागेत राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांची भेट घेणार असल्याची बातमी समोर आल्याने राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाल्या आहेत.

यासंदर्भात माध्यमांनी बच्चू कडू यांच्याशी संवाद साधला असता बच्चू कडू म्हणाले, ही भेट आगोदरच ठरली होती. कालचा मोर्चाबाबत सरकारशी चर्चा केली. तशीच शरद पवार यांच्याशीही चर्चा करायची आहे. राज्यातील शेतकरी आणि दिव्यांगांचे, शेतमजूरांचे जे प्रश्न आहेत त्याबाबत त्यांच्याशी चर्चा करायाची आहे.

आजच्या भेटीत जर शरद पवार यांनी महाविकास आघाडीत येण्याची ऑफर दिली तर तुम्ही जाणार का, असा सवाल विचारलाअसता बच्चू कडू म्हणाले, कालच्या मागण्यांबात मुख्यमंत्र्यांनी वेळ मागितला आहे. राज्य सरकारला १ सप्टेंबर पर्यंत सरकारला वेळ दिला आहे. १ सप्टेंबर पर्यंत आम्ही इतर पक्षांशीही चर्चा करणार आहोत. मविआ सोबत जाण्याचा अद्याप निर्णय नाही.१ सप्टेंबर पर्यंत काहीच नाही.

## 'हर घर तिरंगा मोहीम'ला सुरूवात; मोहिमेत सहभागी होण्याचे भारतीयांना पंतप्रधानांचे आवाहन

**नवी दिल्ली :** यंदा भारताचा ७५ वा स्वातंत्र्यदिन आहे. म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदींनी हर घर तिरंगा मोहिमेत सहभागी होण्याचे भारतीयांना आवाहन केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०२४ च्या स्वातंत्र्य दिनापूर्वी 'हर घर तिरंगा' मोहीम सुरू केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी त्यांच्या सोशल मीडिया अकाऊंट 'एक्सवर' वर



तिरंग्याचे चित्र लावले आहे.

२८ जुलै रोजी प्रसारित होणाऱ्या त्यांच्या मासिक 'मन की बात' रेडिओमध्ये, पंतप्रधान मोदींनी हर घर तिरंगा मोहिमेबद्दल बोलले होते आणि लोकांना harghartiranga.com या वेबसाइटवर राष्ट्रध्वजासह सेल्फी अपलोड करण्याचे आवाहन देखील त्यांनी जनतेला केले होते. ही मोहिम ९ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट पर्यंत राबवण्यात येणार आहे. शुक्रवारी(९ ऑगस्ट) पीएम ने त्यांचा प्रोफाईल डीपी बदलला आणि सोशल मीडियावर पोस्ट करत म्हणले की, 'मी माझे प्रोफाईल पिक्चर बदलत आहे आणि मी तुम्हा सर्वांना विनंती करतो की तेच करा. आपला स्वातंत्र्यदिन साजरा तिरंगा साजर करण्यात मला सामील व्हा. आणि १५ ऑगस्ट दिवशी तिरंगासोबत तुमचा सेल्फी harghartiranga.com वर शेअर करा.

हर घर तिरंगा अभियानाची ही तिसरी आवृत्ती आहे. प्रत्येक भारतीयाला राष्ट्रध्वज, तिरंगा फडकवण्यासाठी प्रोत्साहित करून जनतेमध्ये देशभक्तीची भावना जागृत करण्याच्या उद्देशाने ही मोहीम सुरू करण्यात आली होती. ९ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट च्या कालावधीत हर घर तिरंगा मोहिम राबवली जाते.

## निवडणूक काळात केवळ विकासावरच बोलणार : अजित पवार

**शिर्डी :** लोकसभा निवडणूक प्रचारादरम्यान जे काही घडले ते झाले गेले, गंगेला मिळाले. या पुढील काळात आम्ही फक्त विकासावरच बोलणार, असा निर्वाळा उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रमुख अजित पवार यांनी पत्रकारांशी बोलताना दिला. महायुतीतील अंतर्गत बाबींवर चर्चाही अंतर्गतच होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

लोकसभा निवडणूक प्रचारादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुण्याच्या सभेत बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांचा 'भटकती आत्मा' असा उल्लेख केला होता. लोकसभा निवडणुकीत त्याचा मोठा फटका महायुतीला सहन करावा लागला. मोदी यांच्या या विधानामुळे शरद पवार यांच्या बद्दल राज्यभरात असलेल्या सहानुभूतीत वाढच झाल्याचे मतदानात बघायला मिळाले.

मात्र, याबद्दल आता काही भाष्य करणे योग्य होणार नाही. मागच्या सगळ्या बाबी सोडून देऊन या निवडणुकीत आम्ही फक्त विकासाबाबत बोलणार आहोत. राज्य सरकारच्या कल्याणकारी योजना अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवणार आहोत, असे अजित पवार यांनी सांगितले. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची जनसन्मान यात्रा नगर जिल्ह्यात पोहोचली असून अजित पवार यांनी प्रमुख नेत्यांसह शिर्डी येथे साईबाबांचे दर्शन घेतले. त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते.

आरक्षणाच्या प्रश्नावर पुन्हा सर्वपक्षीय बैठकीचे आयोजन

मराठा समाजाला इतर मागास प्रवर्गातून आरक्षण मिळावे अशी मराठा आरक्षण आंदोलक मनोज जिरंगे पाटील यांची आग्रही मागणी आहे तर मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण न देता स्वतंत्र आरक्षण द्यावे, या मागणीवर इतर मागासवर्ग ठाम आहे. आरक्षणाच्या प्रश्नावर राज्याच्या विशेषता ग्रामीण भागात मराठा आणि इतर मागासवर्ग यांच्यात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी यापूर्वी सर्वपक्षीय बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, विरोधी पक्ष या बैठकीला उपस्थित राहिले नाहीत. त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्व विरोधी नेत्यांची संवाद साधला असून पुन्हा सर्वपक्षीय बैठकीचे आयोजन करण्यात येणार आहे. त्याला हे नेते उपस्थित राहतील, असे पवार यांनी सांगितले.

राज्य सरकारमधील अजित पवार गटाचे ज्येष्ठ मंत्री आणि ओबीसी नेते छगन भुजबळ ज्या ज्या उमेदवारांच्या प्रचाराला जातील त्या त्या उमेदवारांचा आम्ही पराभव करू, असा इशारा जरांगे पाटील यांनी दिला आहे. याबद्दल विचारणा केली असता अजित पवार यांनी प्रतिक्रिया देण्यास नकार दिला.

केंद्र सरकारने वक्फ बोर्डाच्या कायद्यात सुधारणा करण्याचे प्रस्तावित केल्या असून त्यासाठी संयुक्त संसदीय समिती ही स्थापन करण्यात आली आहे. केंद्र सरकारच्या या प्रस्तावावरून दोन्ही सभागृहांमध्ये मोठा गोंधळ झाला. याबाबत अजित पवार गटाची भूमिका काय, असा सवाल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्याध्यक्ष सुप्रिया सुळे यांनी केला आहे.

## जरांगेंच्या आंदोलनामागे उद्धव ठाकरे व शरद पवारांचे राजकारण

**संभाजीनगर :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे सध्या मराठवाडा दौऱ्यावर आहे. त्यांच्या दौऱ्याचा आज शेवटचा दिवस असून संभाजीनगरमध्ये त्यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी मराठा आरक्षणाबाबत त्यांची भूमिका स्पष्ट केली. राज ठाकरे यांचा दौरा मराठा कार्यकर्त्यांमुळे जास्त चर्चेत राहिला आहे. राज्याला आरक्षणाची गरज नसल्याच्या भूमिकेवर देखील राज ठाकरे ठाम राहिले आहे. महाराष्ट्राला आरक्षणाची गरज का नाही याबाबत त्यांनी स्पष्टीकरण देखील दिले. या मुद्द्यावरुन राज ठाकरे यांनी जेष्ठ नेते शरद पवार व उद्धव ठाकरे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनामागून शरद पवार व उद्धव ठाकरे राजकारण करत असल्याचा घणाघात राज ठाकरे यांनी केला आहे.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरुन राजकारण करणाऱ्या नेत्यांना खडेबोल सुनावले. राज म्हणाले, माझ्या मराठवाडा दौऱ्यामध्ये मनोज जरांगे पाटील यांचा काहीही संबंध नव्हता. म्हणजे त्यांच्या विषय पण नव्हता. आपल्याकडे आरक्षणावरुन फक्त जातीय राजकारण केले जात आहे. जातीच्या राजकारणातून तरुणांची माथी भडकवली जातात. जरांगे पाटील यांच्या आंदोलनाच्या मागून उद्धव ठाकरे व शरद पवार यांच्यासारखी मंडळी राजकारण करत आहेत. मराठवाड्यामध्ये ते दिसून येत आहे. धाराशिवमध्ये माझ्या हॉटेलखाली आलेल्या लोकांमध्ये देखील या दोन नेत्यांचे समर्थक होते. तुतारीसोबत या लोकांचे फोटो आहेत. उद्धव ठाकरे गटाचे देखील दोन लोकं होती. नांदेडमध्ये सर्किट हाऊसवर जाऊन ओरडणाऱ्या दोन लोकांपैकी एकाचा शरद पवारांसोबत आत्ताचा फोटो आहे. काल जे झाले त्यामध्ये शिवसेनेचा जिल्हाप्रमुख होता, असा गंभीर खुलासा राज ठाकरे यांनी केला.

## तुमचे राजकारण तुम्हाला लखलाभ, माझ्या नादी लागू नका : राज ठाकरे यांचा इशारा

**छत्रपती संभाजीनगर:** महाराष्ट्रात आरक्षणाच्या नावाखाली घाणेरडे राजकारण सुरू आहे. तुमचे राजकारण तुम्हाला लखलाभ असो. मात्र, माझ्या नादी लागू नका. नाहीतर माझे कार्यकर्ते असे काही करतील की घरी जाऊन आरशात तोंड, पाठ आणि पोट बघावे लागेल, असा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी त्यांना आरक्षणाबाबत जाब विचारणाऱ्यांना आणि त्यांच्या ताफ्यासमोर सुपाऱ्या फेकणाऱ्यांना पत्रकार परिषदेत बोलताना दिला.

विधानसभा निवडणुकीच्या पूर्वतयारीसाठी महाराष्ट्राच्या दौऱ्यावर असलेले राज ठाकरे धाराशिव येथे ज्या हॉटेलमध्ये मुक्कामाला होते त्या ठिकाणी मराठा आरक्षणाबाबत ठाकरे यांच्या भूमिके संबंधी विचारणा करण्यासाठी आलेल्या आंदोलकांनी ठाकरे यांची भेट होईपर्यंत तिथेच ठिय्या मांडण्याचा पवित्रा घेतल्यामुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले. त्याचप्रमाणे मनसे हा सुपारीबाजांचा पक्ष असल्याचा आरोप करून बीड येथे ठाकरे यांच्या वाहनांच्या ताफ्यासमोर सुपार्या फेकण्यात आल्या. या प्रकारांबद्दल ठाकरे यांनी संताप व्यक्त केला.

आरक्षणाबाबत आपली भूमिका स्पष्ट आहे, असे सांगत ठाकरे यांनी महाराष्ट्राला आरक्षणाची गरज नाही, या विधानाचा पुनरुच्चार केला. शाहू महाराजांनी गरजवंतांना आरक्षण द्यावे, असे सांगितले होते. त्यानुसार आर्थिक दुर्बल घटकांना आरक्षण मिळणे आवश्यक होते.. इथे मात्र सगळे जातीचे राजकारण चालले आहे. त्यामुळे राजकारणाचा चिखल झाला आहे, अशी टीका ठाकरे यांनी केली.

काल मराठा आंदोलकांच्या नावाखाली जिल्हाप्रमुखासह शिवसैनिकांनी 'एक मराठा, लाख मराठा,' या घोषणा देत आपल्यासमोर हुल्लडबाजी केली. आपल्या कार्यकर्त्यांनी त्यांचा चांगला समाचार घेतला. ऐनवेळी जर पोलीस मध्ये पडले नसते तर त्यांची काही खैर नव्हती, असेही ठाकरे यांनी सांगितले.

केंद्रात दहा वर्षापासून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार सत्तेवर आहे. आपण शरद पवार यांच्या



बोटाला धरून राजकारणात आलो, असे मोदी सांगत होते. त्यावेळी पवार यांनी मोदी यांना सांगून मराठा आरक्षणावर तोडगा का काढला नाही? उद्धव ठाकरे भारतीय जनता पक्षाबरोबर पाच वर्ष सत्तेत होते. त्यावेळी त्यांनी मोदी यांची मदत घेऊन या प्रश्नावर मार्ग का काढला नाही, असे सवाल राज ठाकरे यांनी केले. साधारणपणे २००५ च्या दरम्यान मराठा आरक्षणासाठी मोर्चाला सुरुवात झाली. या मोर्चात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि भाजप या सगळ्या पक्षांचे नेते उपस्थित होते. त्यांनी मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे, अशीच भूमिका मांडली. मग तुमचे सगळ्यांचे एकमत असेल तर मराठा समाजाला आरक्षण द्यायला तुम्हाला अडवले कुणी, असा सवालही राज ठाकरे यांनी केला.

## महत्त्वाचे

### ज्येष्ठ अभिनेते विजय कदम यांचे निधन



**मुंबई:** मराठी रंगभूमी आणि चित्रपटातील ज्येष्ठ अभिनेते विजय कदम यांचे दीर्घ आजाराने आज पहाटे निधन झाले. ते ६७ वर्षांचे होते. त्यांच्या मागे पत्नी व मुलगा असा परिवार आहे. त्यांच्या निधनामुळे मराठी नाट्य व चित्रपटसृष्टीवर शोककळा पसरली आहे.

कदम हे दीड वर्षासून कर्करोगाशी झुंज देत होते. उपचार सुरू असतानाच अंधेरी येथील राहत्या घरी कदम यांचे निधन झाले. आज दुपारी अंधेरी स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंतिम संस्कार करण्यात येणार आहेत.

महाराष्ट्रात लोकप्रियतेचे शिखर गाठलेल्या 'विच्छा माझी पुरी करा' या लोकंनाट्यामुळे कदम यांचे नाव मराठी भाषिकांच्या घराघरात पोहोचले. हजरजबाबी संवाद आणि सहज सुंदर अभिनय यामुळे ते लोकप्रिय झाले. आम्ही दोघे राजा राणी', 'चष्मेबहाद्दर', पोलीसलाईन',हळद रुसली कुंकू हसलं यांसारख्या अनेक चित्रपटातील त्यांच्या भूमिका ही गाजल्या. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रात हळहळ व्यक्त केली जात आहे.

### देशाचे माजी परराष्ट्रमंत्री नटवर सिंह यांचे निधन



**नवी दिल्ली :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि देशाचे माजी परराष्ट्र मंत्री नटवर सिंह यांचे शनिवारी रात्री उशिरा निधन झाले. वयाच्या ९५ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. माजी मंत्री नटवर सिंह हे गेल्या काही दिवसांपासून आजारी होते. त्यांच्यावर गुरुग्राममधील मेदांता रुग्णालयात उपचारही सुरू होते. आज त्यांची प्राणज्योत मावळली.

नटवर सिंह यांचे देशाच्या राजकारणात खूप मोठं योगदान आहे. नटवर सिंग यांनी २००४-०५ दरम्यान णझ--ख सरकारमध्ये भारताचे परराष्ट्र मंत्री म्हणून काम केले.

या काळात पंतप्रधान मनमोहन सिंग होते. त्यांनी पाकिस्तानचे राजदूत म्हणूनही काम केले आणि १९६६ ते १९७१ या काळात तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या कार्यालयात ते संलग्न होते. तसेच १९५३ मध्ये त्यांची भारतीय परराष्ट्र सेवेसाठी निवड झाली होती.

# ‘लाडकी म्हैस’ योजनेसाठी १५ ऑगस्टला कराडला मोर्चा

## बळीराजा संघटनेचे दूध दरप्रश्नी आंदोलन

**कराड :** दूधविक्री लिटरला ७० रुपयांवर आणि याचा खरेदीदर ४० रुपये हे न परवडणारे आहे. दूध उत्पादक अनुषंगाने म्हैस व गायीवर हा अन्यायच असल्याने ‘लाडकी बहीण’प्रमाणे ‘लाडकी म्हैस’ योजना आणण्यासाठी १५ ऑगस्टला भव्य मोर्चा काढून शासनाला जाब विचारणार असल्याचा इशारा बळीराजा शेतकरी संघटनेच्या युवा शाखेचे प्रदेशाध्यक्ष गणेश शेवाळे यांनी दिला.



शेवाळे म्हणाले, शासकीय योजनांचे लाभार्थी होताना, शेतकऱ्यांसह महिला व अन्य घटकांचे प्रचंड हाल होत असून, त्यांची प्रशासनाकडून कुचेष्टाच सुरू आहे. लाभार्थ्यांची ‘गाढव मेलं ओझ्यानं अन् शिंगरू मेलं हेलपाट्यांन.’ अशी अवस्था झाल्याने त्याविरोधातही हे आंदोलन आहे.

देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे लोटली तरी सुद्धा प्रशासकीय कार्यालयांमध्ये विशेषतः शेतकरी, कष्टकरी, महिला व गोरगरिबांवर अन्याय सुरू आहे. प्रधानमंत्री किसान योजना, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण अशा योजनांच्या कागदपत्रांसाठी लाभार्थींची प्रचंड परवड सुरू आहे. त्यात मिळायचे दीड- दोन हजार रुपये अन् त्याच्या हेलपाटेवारी जायचे चार हजार रुपये अशी दयनीय स्थिती आहे.

याला विरोध करण्यासह दुधाला चांगला वाढीव दर मिळावा म्हणून राज्यात ‘लाडकी म्हैस योजना’ आणली जावी म्हणून सातारा जिल्हाधिकारी, कराड प्रांताधिकारी व तहसीलदार कार्यालयावर १५ ऑगस्टला भव्य मोर्चा काढणार आहे. त्यात राष्ट्रीय समाज पक्ष व अन्य पक्ष, संघटनाही सहभागी होतील, असे गणेश शेवाळे यांनी या वेळी सांगितले.

# मराठा आरक्षण शांतता फेरीनिमित्त शहरातील वाहतुकीत बदल

**पुणे :** मराठा आरक्षणासाठी रविवारी (११ ऑगस्ट) मराठा आरक्षण शांतता फेरीचेआयोजन करण्यात आले आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत फेरी काढण्यात येणार असून, शहरातील वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात येणार आहेत.

सारसबाग परिसरातून रविवारी सकाळी अकराच्या सुमारास फेरीचा प्रारंभ होणार आहे. टिळक रस्त्यावरील पूरम चौक, बाजीराव रस्ता, शनिपार, अप्पा बळवंत चौक, शनिवारवाडा, गाडगीळ पुतळा, छत्रपती शिवाजी महाराज पूल, एसएसपीएमएस, स. गो. बर्वे चौक (मॉडर्न कॅफे), जंगली महाराज रस्ता, झाशीची राणी चौक,जंगली महाराज रस्ता मार्गे फेरी काढण्यात येणार आहे. डेक्कन जिमखाना भागातील छत्रपती संभाजी पुतळा येथे फेरी विसर्जित होणार आहे. शहराच्या मध्यभागातून फेरी जाणार असल्याने वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात येणार आहे. फेरी मार्गस्थ झाल्यानंतर पाठीमागील रस्ते वाहतुकीस खुले करून दिले जाणार आहे, अशी माहिती वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त रोहिदास पवार यांनी दिली.

स्वारगेट परिसरातील जेधे चौक, सोलापूर रस्ता, सातारा रस्ता, सिंहगड रस्ता, टिळक रस्ता, शास्त्री रस्ता, लक्ष्मी रस्ता, केळकर रस्ता, बाजीराव रस्ता, छत्रपती शिवाजी महाराज रस्ता, जंगली महाराज रस्ता, कर्वे रस्ता, डेक्कन जिमखाना भागातील वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात येणार आहेत.

**वाहतूक वळविण्यात येणारे प्रमुख चौक**

- नवले पुल - वाहतुकीचा आढावा घेऊन नवले पुलाकडून येणारी वाहतुक नवीन बोगद्याकडे वळविण्यात येईल.
- कोंढवा खडीमशीन चौक - जड वाहने कात्रजकडे न सोडता बोपदेव घाटमार्गे जातील.
- कात्रज चौकमार्गे फेरी लक्ष्मीनारायण चित्रपटगृह चौकमार्गे जाणार आहे.
- फेरी मार्गस्थ झाल्यानंतर पाठीमागील वाहतूक पूर्ववत करण्यात येणार आहे.

सिंहगड रस्त्यावरील वाहतुक बदल

जेधे चौकातून सिंहगड रस्त्याकडे जाणारी वाहतूक लक्ष्मीनारायण चित्रपटगृह चौकमार्गे, मित्रमंडळ चौक, सावरकर चौकमार्गे जाणार आहे. सिंहगड रस्त्यावरुन येणाऱ्या वाहनांनी दांडेकर पूल, सावरकर चौक, मित्रमंडळ चौक, लक्ष्मीनारायण चित्रपटगृहमार्गे इच्छितस्थली जावे. नीलायम चित्रपटगृह ते सावरकर पुतळा चौक वाहतूक बंद राहणार आहे. ना. सी. फडके चौक, सणस पुतळ्याकडे जाणारा मार्ग वाहतुकीस बंद ठेवण्यात येणार आहे. टिळक रस्त्यावरील स. प. महाविद्यालय ते पूरम चौक दरम्यानची वाहतूक बंद राहणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज रस्ता, राष्ट्रभूषण चौकमार्गे जाणारी वाहने शंकरशेठ रस्त्याने इच्छितस्थळी जातील. शंकरशेठ रस्त्यावरील ढोले-पाटील चौक (सेव्हन लव्हज चौक ) ते जेधे चौक दरम्यान वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे. या भागातून जाणाऱ्या वाहनांनी मार्केट यार्ड किंवा नेहरू रस्त्याने इच्छितस्थळी जावे. मार्केट यार्ड ते जेधे चौक दरम्यान वाहतूक बंद राहणार आहे. या भागातील वाहनांनी शिवनेरी रस्त्याने वखार महामंडळ चौकातून इच्छितस्थळी जावे. पंचमी हॉटेल ते जेधे चौक दरम्यानची वाहतूक बंद राहणार आहे.

# राज्यातील ५०० पोलीस उपनिरीक्षकांच्या खांद्यावर लागला ‘तिसरा स्टार’

**नागपूर :** राज्य पोलीस दलातील पोलीस उपनिरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांची पदोन्नती गेल्या दोन वर्षांपासून रखडली होती. मात्र, आगामी स्वातंत्र्य दिनाच्या पाच दिवसांपूर्वी गृहमंत्रालयाने राज्यातील ५०० पोलीस उपनिरीक्षकांना पदोन्नतीची यादी जाहीर करण्यात आली. बहुप्रतिक्षेत असलेल्या उपनिरीक्षकांच्या खांद्यावर अखेर तिसरा स्टार’ लागल्याने पोलीस अधिकाऱ्यांत आनंदाचे वातावरण आहे.

राज्य पोलीस दलातील उपनिरीक्षकांची १११ आणि ११२ क्रमांकाच्या तुकडी गेल्या दोन वर्षआंपासूनच पदोन्नतीच्या कक्षेत होती. मात्र, गृहमंत्रालय आणि पोलीस महासंचालक कार्यालयात योग्य समन्वय नसल्यामुळे पदोन्नतीला खिळ बसली होती. त्याचा फटका शेकडो पोलीस अधिकाऱ्यांना बसला होता. तसेच १०३ तुकडीचे पोलीस अधिकाऱ्यांपूर्वी पदोन्नती मिळविण्यासाठी काही अधिकारी न्यायालयात गेले होते. त्यामुळे राज्यातील सर्वच पदोन्नती प्रक्रिया रखडली होती. शेवटी न्यायालयाच्या आदेशाने पदोन्नती प्रक्रिया करण्यात आली. राज्यातील सर्वात वरिष्ठ असलेले पोलीस अधिकारी (१११ तुकडी) हे गेल्या २०२२



पासून पदोन्नतीच्या कक्षेत होते. मात्र, त्यांच्या पदोन्नती प्रक्रियेकडे पोलीस महासंचालक कार्यालयाने दुर्लक्ष केले. पोलीस अधिकाऱ्यांनी महासंचालक कार्यालयात वारंवार पाठपुरावा केला. तसेच ‘लोकसत्ता’ने अधिकाऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी वृत्त मालिका प्रकाशित केली होती. अखेर स्वातंत्र्य दिनाच्या पाच दिवसांपूर्वी राज्यातील ५०० पोलीस उपनिरीक्षकांना सहायक पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नती देण्यात आली. यामध्ये सर्वाधिक अधिकारी मुंबई, पुणे आणि नाशिक आयुक्तालयातील आहेत.

पदोन्नतीत तीन तुकडीतील अधिकारी

राज्य पोलीस दलातील १११ क्रमांकाच्या तुकडीतील सर्वाधिक ३२५ पोलीस उपनिरीक्षकांना पदोन्नती देण्यात आली. तसेच ११२ तुकडीतील १४० अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्याता आली. तसेच ११३ तुकडीतील २५ पोलीस उपनिरीक्षकांनाचाही पदोन्नतीमध्ये समावेश करण्यात आला आहे. पोलीस महासंचालक कार्यालयाने ६७८ सहायक निरीक्षकांची पदे रिक्त असताना ६३८ उपनिरीक्षकांना संवर्ग मागितला होता. मात्र, पदोन्नती फक्त ५०० अधिकाऱ्यांना दिली आहे. उर्वरित १३८ उपनिरीक्षकांचा मात्र यावेळी हिरमोड झाला आहे.

राज्य पोलीस दलात २०१३ मध्ये पोलीस उपनिरीक्षक पदासाठी पात्र असलेल्या जवळपास ५ हजार कर्मचाऱ्यांना पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. मात्र, अजूनही जवळपास ७ ते ८ हजार पोलीस कर्मचारी विभागीय कोट्यातून पदोन्नतीच्या प्रतीक्षेत आहेत. गेल्या काही दिवसांपूर्वी १२०० कर्मचाऱ्यांची यादी महासंचालक कार्यालयाकडून जाहिर करण्यात आली होती. मात्र, त्यापैकी केवळ ६१० कर्मचाऱ्यांना पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती देण्यात आली होती. त्यामुळे उर्वरित ६०० कर्मचाऱ्यांची निराशी झाली आहे.

## शिवसेनेचा भगवा सप्ताह उत्साहात

**पुणे :** शिवसेना उध्दव बाळासाहेव ठाकरे पक्षाच्या वतीने दौंड विधानसभा मध्ये मौजे कुरकुंभ येथे भगवा सप्ताह मोठ्या उत्साहात सुरु करण्यात आला. त्यावेळी प्राथमिक सदस्य नोंदणी करण्यात आली. दौंड शहर आणि तालुक्यातून ५0000 सदस्य नोंदणी करण्याचे यावेळी जिल्हाप्रमुख शरदचंद्र सूर्यवंशी यांनी जाहीर केले,त्यावेळी युवासेना ता उपधिकारी किरण वाळुंजकर,शंकर शितोले ,संपत शिंदे, राहुल मोरे आदि शिवसैनिक उपस्थित होते.

# पारनेरमधून विधानसभेला पत्नीला मैदानात उतरवणार?

**अहमदनगर :** लोकसभा मतदारसंघातून भाजप खासदार सुजय विखे पाटील यांचा पराभव करत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवारनिलेश लंकेहे जायंट किलर ठरले. लंके यांनी ऐन लोकसभा निवडणुकीपूर्वी आमदारकीचा राजीनामा देत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीतून शरद पवारांच्या पक्षात प्रवेश केला होता.निलेश लंकेयांच्या राजीनाम्यामुळेपारनेरविधानसभेची जागा रिक्त झाली आहे. मात्र आता विधानसभा निवडणूक अगदी काही महिन्यांवर येऊन ठेपल्याने या मतदारसंघात पोटनिवडणूक होणार नाही. त्यामुळे यंदाच्या विधानसभा निवडणुकीतपारनेरमधूनशरद पवार यांच्या राष्ट्रवादीचा उमेदवार नक्की कोण असणार, याबाबतच्या चर्चांना उधाण आलं आहे. याबाबत नवी दिल्ली इथं झालेल्या पत्रकार परिषदेत पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला निलेश लंके यांनी चाणाक्षपणे उत्तर देत आपले पारनेरमधील उमेदवारीबाबत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना निलेश लंके म्हणाले की, आमच्या पक्षाचा उमेदवार कोण असणार, हे ठरवणारा मी कार्यकर्ता नाही. प्रत्येक पक्षात नेतेमंडळी असतात. या नेत्यांकडून जो उमेदवार दिला जाईल, त्या उमेदवाराचं काम करणं ही माझी जबाबदारी आहे, असं उत्तर देत निलेश लंके यांनी शेवटी स्मितहास्य केलं.राणी लंके यांच्याच नावावर शिक्कामोर्तब होण्याची शक्यतानिलेश लंके हे अत्यंत सावधपणे आपली राजकीय पावलं टाकत असतात. लोकसभा निवडणुकीपूर्वी अगदी शेवटच्या क्षणापर्यंत ते आपण पक्षांतर करणार नसल्याचं सांगत होते. मात्र उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या काही दिवस आधी त्यांनीअजित पवारांची साथ सोडत शरद पवारांच्या पक्षाची तुतारी हाती घेतली.



खरंतर सुरुवातीला त्यांनी लोकसभेसाठी पत्नी राणी लंके यांना उमेदवारी मिळवण्यासाठीच प्रयत्न सुरू केल्याचं दिसत होतं. त्यादृष्टीने मतदारसंघात होणाऱ्या विविध कार्यक्रमांच्या होर्डिंग्जवरही राणी लंके यांचे फोटो झळकू लागले होते. परंतु ऐनवेळी निलेश लंके यांनी स्वत:च लोकसभेच्या मैदानात उतरण्याचा निर्णय घेतला आणि हे मैदान मारत त्यांनी विजयही मिळवला. आता स्वत: खासदार झाल्यानंतर हक्काच्या पारनेर मतदारसंघात त्यांच्याकडून राणी लंके यांच्या उमेदवारीची मागणी केली जाण्याची दाट शक्यता आहे.दरम्यान, काही आठवड्यांपूर्वी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांच्या नगर जिल्ह्यातील एका कार्यक्रमातूनही याबाबतचे संकेत मिळाले होते. लोकसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या सर्वच उमेदवारांना चांगली मते मिळाली. त्यामुळे आता विधानसभेत हीच जादू चालणार आहे. शिवसेना उपनेते साजन पाचपुते आणि खासदार निलेश लंके यांच्या पत्नी राणी लंके या विधानसभेत जातील, असं वक्तव्य राऊत यांनी श्रीगोंदा येथील एका कार्यक्रमादरम्यान केलं होतं.

# केशवराव भोसले नाट्यगृह उभारणीसाठी २० कोटींचा निधी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची पाहणीनंतर घोषणा

**पुणे :** संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृह पूर्वीच्याच दिमाखात उभे केले जाईल. त्यासाठी शासनाच्या वतीने २० कोटी रुपयांचा निधी देण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी कोल्हापूर येथे केली.



केशवराव भोसले नाट्यगृह उभारणीसाठी २० कोटींचा निधी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची पाहणीनंतर घोषणा (छायाचित्र - लोकसत्ता टीम)

कोल्हापूर : संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृह पूर्वीच्याच दिमाखात उभे केले जाईल. त्यासाठी शासनाच्या वतीने २० कोटी रुपयांचा निधी देण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी कोल्हापूर येथे केली. येथील संगीत सूर्य केशवराव भोसले नाट्यगृहाला शनिवारी आग लागली. यामध्ये या ऐतिहासिक नाट्यगृहाची अपरिमित हानी झाली आहे. या घटनेची पाहणी शनिवारी रात्री मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. पालकमंत्री हसन मुश्रीफ, राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर, अधिकारी, पदाधिकारी उपस्थित होते.

यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, केशवराव भोसले यांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला त्यांच्या नावाच्या नाट्यगृहाला आग लागणे ही दुर्दैवी बाब आहे. या घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई केली जाईल.

राजर्षी शाहू महाराज यांच्या कलासक्त नजरेतून १०९ वर्षांपूर्वी बांधण्यात आलेल्या या वास्तूची घडणावळ पाहता ती पुन्हा होणे नाही. या नाट्यगृहाशी कोल्हापुरातील कलाकार, नागरिकांच्या भावना जोडलेल्या आहेत. नाट्यगृह जसेच्या तसे व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली जात असून त्यासाठी अनेकांचे हात मदतीसाठी पुढे आले असल्याचा उल्लेख त्यांनी केला.

या नाट्यगृहाच्या पुनर्उभारणीसाठी २५ कोटी रुपये निधीची गरज आहे. नाट्यगृहाचा ५ कोटींचा विमा उतरवलेला आहे. उर्वरित २० कोटी रुपयांची रक्कम राज्य शासन देईल. सामान्यांना न्याय देणारे आणि कलावंतांचा आदर करणारे हे सरकार असल्याने ही रक्कम लगेचच दिली जाईल. युद्धपातळीवर नाट्यगृह उभारणीचे काम पूर्ण करून कोल्हापूरकरांच्या सेवेमध्ये ते आणले जाईल. हीच केशवराव भोसले यांना खरी श्रद्धांजली ठरेल, असेही त्यांनी सांगितले.

# जया बच्चन, तुम्ही सेलिब्रिटी असाल पण हे सभागृह आहे; सभापतींनी खडसावलं!

मागील काही दिवसांपासून राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड आणि राज्यसभेच्या सदस्या जया बच्चन यांच्यात नावाच्या उल्लेखावरून वाद सुरू आहेत. या वादाचा आज दुसरा अंक बघायला मिळाला आहे. यावेळी सभापतींनी जया बच्चन यांना चांगलेच खडसावलं. यावेळी सभागृहात गदारोळदेखील बघायला मिळाला.

**राज्यसभेत काय घडलं?**

दरम्यान, आज पुन्हा एकदा राज्यसभेचे सभापती जगदीप घनखड यांनी जया बच्चन यांच्या नावाचा उल्लेख करताना ‘जया अमिताभ बच्चन’ असा केला. यावर बोलताना, जया बच्चन यांनी पुन्हा आक्रमक होत नाराजी व्यक्त केली. मी जया अमिताभ बच्चन, आज हे सांगू इच्छिते की मी एक कलाकार आहे. मला इतरांची देहबोली आणि चेहऱ्यावरील हावभाव समजतात. तुम्ही ज्या पद्धतीने बोलत आहात, मला पण तुमचा बोलण्याचा टोन हा मान्य नाही. आपण सहकारी आहोत, असं त्या म्हणाल्या.



### नेमकं प्रकरण काय?

**गेल्या आठवड्यात राज्यसभेच्या तालिका सभापतींनी खासदार जया बच्चन यांचं नाव घेताना ‘जया अमिताभ बच्चन’ असा उल्लेख केला होता. त्यावर जया बच्चन यांनी नाराजी व्यक्त केली होती. माझी स्वतंत्र ओळख असताना अभिताभ बच्चन यांचे नाव घेऊ नये, असे त्या म्हणाला. त्यानंतर काही दिवसांनी पुन्हा अशाच प्रकारची घटना घडली. मात्र, त्यावेळी राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड हे पीठासीन अधिकारी म्हणून काम करत होते. यावेळीसुद्धा जया बच्चन यांनी नाराजी व्यक्त केली होती. तसेच जया बच्चन आणि जगदीप धनखड यांच्या शाब्दिक युद्ध रंगले होते.**

### राज्यसभेच्या सभापतींनी जया बच्चन यांना खडसावलं!

**जया बच्चन यांच्या या प्रतिक्रियेनंतर सभापती जगदीप घनखड यांनीही त्यांना चांगलेच खडसावलं. तुम्ही अभिनय क्षेत्रात खूप नाव कमावलं आहे. आम्ही सर्व तुमचा आदर करतो. तुम्हाला माहिती असेल की अभिनेत्याला कुठली गोष्ट कशी सांगायची हे दिग्दर्शकाला ठरवत असतो. ज्या गोष्टी मी या खुर्चीत बसून बघू शकतो, त्या तुम्ही तिथे बसून बघू शकत नाही. मला दररोज हा वाद नको आहे. आता बास झालं. तुम्ही भलेही सेलिब्रिटी असाल पण तुम्हाला सदनाचे पावित्र्य राखावेच लागेल. मी हे सारखं सारखं सहन करणार नाही, असे ते म्हणाले.**

## एम एस पी सी च्या माध्यमातून फार्मासिस्ट होणार स्मार्ट

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषद ने राज्यातील ४ लाख ३० हजार फार्मासिस्टला जगभरात औषध क्षेत्रामध्ये आलेले नवीन तंत्रज्ञान व कृत्रिम प्रज्ञा ( ए आय ) च्या युगात सज्ज राहण्यासाठी व औषधांचे परिपूर्ण सखोल ज्ञान व भान येण्यासाठी फार्मासिस्टची उन्नत्ती हा कार्यक्रम अमृत महोत्सवानिमित्त आयोजित केला आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम होत असल्याची माहिती अध्यक्ष अतुल अहिरे यांनी मुंबई मराठी पत्रकार संघ येथे आयोजित पत्रकार परिषदेत शनिवारी दिली.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

## जबरी चोरी प्रकरणी एकावर गुन्हा

**सातारा** : जबरी चोरी प्रकरणी एकावर शाहूपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. ८ रोजी सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास रोहित विजय कुंभार रा. कुंभारवाडा, करंजे, सातारा हा सातारा बस स्थानकासमोरील एका चायनीज सेंटरच्या येथून शरद मदन मलिक सध्या रा. बसाप्पा पेठ, सातारा यांचा मोबाईल फोन आणि ७०० रुपये रोख जबरदस्तीने हिसकावून घेऊन पळून गेला. अधिक तपास पोलीस हवालदार इष्टे करीत आहेत.

## सातारा हॉस्पिटल परिसरातून दुचाकीची चोरी

**सातारा** : सातारा हॉस्पिटल परिसरातून अज्ञात चोरट्याने दुचाकीची चोरी केल्याची फिर्याद सातारा शहर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली आहे.याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. ७ रोजी दुपारी अडीच ते रात्री साडेदहा वाजण्याच्या दरम्यान सातारा हॉस्पिटल परिसरातून ऋतुजा संजय पवार रा. शुक्रवार पेठ, सातारा यांची एक्टिवा दुचाकी क्र. एमएच ११० ईबी ६२७० अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. अधिक तपास पोलीस हवालदार जाधव करीत आहेत.

## अपघात प्रकरणी पिकअप चालकावर गुन्हा

सातारा : अपघातात एकास जखमी केल्याप्रकरणी पिकअप चालका विरोधात सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# आठवडी बाजार भरणार यात्रा पटांगणावर : मुख्याधिकारी डॉ. माने

**म्हसवड :** म्हसवड शहराचा होणारा अठवडी बाजार हा यात्रा पटांगणाच्या मैदानावर घेण्यात आला असुन याची नोंद अठवडी बाजार ला येणार्या नागरीकांनी, व्यापार्यांनी, शेतकर्यांनी व व्यावसायिकांनी घ्यावी असे आवाहन म्हसवड नगरपालिकेचे मुख्याधिकारी डॉ. सचिन माने यांनी केले आहे.

म्हसवड शहराचा अठवडी बाजार हा बुधवार रोजी नेहमी होत असतो, येथील अठवडी बाजार हा माण तालुक्यातील सर्वात मोठा अठवडी बाजार म्हणुन ओळखला जातो, शहराचे मध्यवर्ती ठिकाण म्हणुन पालिकेने अठवडी बाजार साठी पालिका इमारती समोरील जागा उपलब्ध करुन दिलेली आहे. पुढील अठवड्यात हा अठवडी बाजार हा दि.१४ रोजी संपन्न होत आहे, मात्र याच पटांगणावर १५ ऑगष्ट निमित्त सार्वजनिक ध्वजारोहन कार्यक्रम संपन्न होणार आहे, त्यामुळे या मैदानाचे सुशोभिकरण व साफसफाई करण्यासाठी पालिका कर्मचार्यांना पुरेसा वेळ हवा असल्याने दि. १४ रोजी होणारा शहराचा अठवडी बाजार हा येथील यात्रा पटांगणावर भरवण्यात येणार असुन अठवडी बाजार निमित्त येणार्या व्यापार्यांनी, शेतकर्यांनी, छोट्या व्यावसायिकांनी आपली दुकाने यात्रा पटांगणावर लावुन पालिकेला सहकार्य करावे असे आवाहन मुख्याधिकारी डॉ. माने यांनी केले आहे.

# नाते येथे कृषिकन्याकडून शेततळ्याचे प्रात्यक्षिक



**खंडाळा :** महाड तालुक्यातील नाते गावात शेतकयांना आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती व्हावी.या उद्देशाने कृषीकन्यांनी शेत तळयाचे प्रात्यक्षिक दाखवित, योजनेची माहीती दिली.या कार्यक्रमास शेतकऱ्यांनी चांगला प्रतिसाद दिला.

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली संलग्न भैरवनाथ निसर्ग मंडळ संचलित कृषी महाविद्यालय आचळोली येथील चतुर्थ वर्षातील कृषीकन्यांनी ग्रामीण कृषी जागरूकता कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत गावात शेततळ्याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. शेततळे व त्याचे विविध प्रकार,फायदे, आवश्यक साहित्य या विषयी माहिती दिली. मागेल त्याला शेततळे या योजनेबाबत मार्गदर्शन करीत लाभार्थ्यांनी लाभ घ्यावा असे सांगितले.उन्हाळ्यात पाण्याची भासणारी कमतरता आणि पावसाच्या अनियमितपणामुळे शेती उत्पादनावर परिणाम होतो.त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत शेततळ्याचा उपयोग जमिनीतील पाण्याची पातळी वाढविणे,मत्स्य उत्पादन, जनावरांच्या पिण्याच्या पाण्यासाठी गरज पूर्ण होवू शकते असे सांगण्यात आले.

यावेळी कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही.जे.गिम्हणेकर,कार्यक्रम समन्वयक प्रा. व्ही. आर. पवार, प्रा. एस. एस दिवाळे, विशाल विरवटकर यांच्या मार्गदर्शनाखाली ममता अलन, सोनाली चव्हाण, करुणा चोपडे, मानसी गायकवाड,गायत्री माने, प्रियंका मोरे,अनन्या पंगेवाड, भाविका पाटील या विद्यार्थिनींनी कार्यक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले.

# डॉ. सुधा मूर्ती यांनी दिल्लीमध्ये घेतली खासदार उदयनराजे यांची भेट

## इन्फोसिसची आयटी कंपनी साताऱ्यात उभारण्याबाबत चर्चा

**सातारा** : इन्फोसिस फाऊंडेशनच्या संस्थापिका राज्यसभेच्या खासदार डॉ. सुधा मूर्ती यांनी खासदार उदयनराजे भोसले यांच्या नवी दिल्ली येथील निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. या प्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा भेट देवून त्यांचे स्वागत केले.

संसदेतील पहिल्याच भाषणात सुधा मूर्ती यांनी महिलांच्या आरोग्य, जागतिक वारसास्थळे, विशेषत छत्रपती शिवाजी महाराजांच्या गड, दुर्ग व देशांतर्गत पर्यटन या मुद्द्यांचा उल्लेख केला, त्याबद्दल उदयनराजे भोसले यांनी त्यांचे अभिनंदन केले.

यावेळी बोलताना डॉ. मूर्ती म्हणाल्या ,की छत्रपती शिवाजी महाराजांनी अतिशय कमी कालावधीत रयतेचे राज्य निर्माण केले. जगाला हेवा वाटावा असे अनेक पराक्रम केले. लोकशाहीचा पाया रचला. त्यांचा इतिहास जगाच्या कानाकोपऱ्यात पोहचवण्याचे कार्य आपण केले पाहिजे.

मूर्ती दाम्पत्याच्या इन्फोसिस कंपनीने देशाच्या विकासामध्ये मोलाचे योगदान दिल्याचे खासदार उदयनराजे भोसले यांनी सांगितले.यावेळी खासदार उदयनराजे भोसले यांनी साताऱ्यात आय टी पार्क उभारण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाच्या बरोबर सुरू असलेल्या प्रयत्नांची कल्पना दिली.

इन्फोसिसच्या माध्यमातून साताऱ्यात आय टी कंपनी सुरू करण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडे पाठपुरावा करू, असे आश्वासित करून इन्फोसिसने आयटी क्षेत्राशी संबंधित केंद्र साताऱ्यात उभारण्याची मागणी खासदार उदयनराजे भोसले यांनी केली. तसेच साताऱ्याला भेट देण्याचे आमंत्रण उदयनराजे यांनी दिले. प्रकल्प उभारण्यात सकारात्मक प्रतिसाद देवून योग्य ती मदत करण्याचे आश्वासन डॉ. सुधा मूर्ती यांनी दिले.



यावेळी प्रतापगड प्राधिकरणचे सदस्य चंद्रकांत पाटील, सोमनाथ धुमाळ, छत्रपती संभाजी महाराज स्मारक समितीचे सदस्य संग्राम बर्गे, ड. विनित पाटील, संदीप शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

# गरजूंनी विधी सेवा प्राधिकरणाचा लाभ घ्यावा : ॲड. पाटील

**खंडाळा :** गोर-गरीब व गरजू व्यक्तींना न्याय मिळावा.या उद्देशाने महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरण काम करत असते. त्याचा लाभ सर्वांनी घ्यावा,असे मत खंडाळा बार असोशिएनचे अध्यक्ष ॲड..पी.व्ही.पाटील यांनी व्यक्त केले.

खंडाळा तालुक्यातील खेड बु. येथे महाराष्ट्र विविध सेवा प्राधिकरण व खंडाळा विधी सेवा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते.यावेळी पॅनेल प्रमुख निवृत्त न्यायाधिश बी.डि.खटावकर, ड. बाळकृष्ण पंडित,ड.श्रेयस क्षिरसागर, ड.व्हि.टी. क्षिरसागर,सरपंच गणेश धायगुडे यांच्यासह नागरीक उपस्थित होते.

निवृत्त न्यायाधिश बी.डि.खटावकर यांनी मार्गदर्शन केल्यानंतर या शिबिरामध्ये हुंडाप्रतिबंध कायदा, वाहतूक नियम, पिडितांना नुकसान भरपाई योजना, न्टी रॅगिंग, मुलींचे हक्क व अधिकार आदी कायदे विषयक विधीज्ञ यांनी माहीती दिली. यावेळी विविध मान्यवर, ग्रामस्थ उपस्थित होते. शेवटी सर्व उपस्थितांचे सरपंच गणेश धायगुडे यांनी आभार मानले.

# शहाजीराजे महाविद्यालय खटाव येथे प्रशासकीय कर्मचाऱ्यांची निदर्शने

**वर्धनगड** : शासन दरबारी असलेल्या प्रलंबित मागण्यांसाठी शिवाजी विद्यापीठ व महाविद्यालयीन प्रशासकीय संघटनेच्या आदेशानुसार शहाजीराजे महाविद्यालय खटाव प्रशासकीय संघटनेने शासनाच्या विरोधात शुक्रवार दि ९ रोजी दुपारी महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारावर निदर्शने केली.

जुनी पेन्शन योजना व आश्वासित प्रगती योजना सर्वच कर्मचाऱ्यांना लागू झाली पाहिजे.शासनाने रिक्त झालेल्या प्रशासकीय कर्मचाऱ्यांच्या जागा तातडीने भरल्याच पाहिजेत अशा घोषणा देण्यात आल्या.यावेळी कार्यालयीन अधिक्षक के सी इनामदार, वरिष्ठ लिपिक एम डी भांगरे,डी जी जाधव,बी एन काटकर,बी डब्ल्यू पवार,ए व्ही मदने,आर एम मदने,वाय एस राऊत,एस एस दुबळे,जी यू गुजर,ए एस गुजर,एस बी लांघी उपस्थित होते.

# आरोग्य विभागाची कागदपत्रे पडताळणी प्रक्रिया पूर्ण

**सातारा** : महाराष्ट्र शासना मार्फत विविध कार्यालयाकडील भरती प्रक्रिया राबवण्यात आली. त्या अंतर्गत जिल्हा परिषद अंतर्गत विविध पदाची भरती प्रक्रिया पुर्ण करणेत आली आहे. त्या अनुषंगाने आरोग्य विभागा कडील आरोग्य सेवक व आरोग्य सेविका यांची ही परिक्षा घेणेत आली होती. त्यामध्ये पात्र झालेल्या उमेदवारांची यादी शासनाकडून विभागास प्राप्त झाली होती. प्राप्त झालेल्या यादी नुसार पात्र उमेदवार यांची कागदापत्र पडताळणी आरोग्य विभागा, जिल्हा परिषद सातारा मार्फत करणेत आली.

आरोग्य विभागा मार्फत करणेत आलेल्या कागदपत्र तपासणी डॉ महेश खलिपे, जिल्हा आरोग्य अधिकारी, जि प सातारा यांच्या मार्गदर्शना खाली श्री श्रीनिवास पाटील, कक्ष अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, सौ संजला शिंदे, अधिक्षक, श्री देशमुख, अधिक्षक यांनी प्रशान व तांत्रिक कर्मचारी यांचे सहभागने दि ५, ६ व ७ ऑगस्ट २०२४ रोजी छ.शिवाजी महाराज सभागृह जि प सातारा येथे करणेत आली.



महाराष्ट्र शासनाकडून आरोग्य सेवक ४०% या संवर्गात एकूण ७५ जागा करीता परिक्षा घेणेत आली त्या करीता एकूण १८५ परिक्षार्थीनां कागदपत्र तपासणी करीता बोलवण्यात आले. या पैकी १५७ उमेदवार हजर होते व २८ उमेदवार गैरहजर होते. त्याच प्रमाणे आरोग्य सेवक महिला या संवर्गात एकूण ३५३ जागा करीता परिक्षा घेणेत आली त्यामध्ये ३३७ उमेदवार पात्र झाले त्यांना कागदपत्र पडताळणी करीता बोलवण्यात आले. या पैकी ३३० उमेदवार कागदपत्र पडताळणी करीता हजर होते व ७ उमेदवार गैरहजर होते. औषध निर्माण अधिकारी यांची एकूण ३५ जागा करीता परिक्षा घेणेत आली, त्यामधील एकूण ९२ पात्र उमेदवारांना कागदपत्र पडताळणी करीता बोलवण्यात आले. यामध्ये १७ उमेदवार गैरहजर होते.

कागदपत्र पडताळणीमध्ये प्रथम हजर असलेल्या उमेदवारांची बायोमेट्रीक हजेरी नोंदवून त्यांची अर्ज सादर करताना सादर केलेले कागदपत्राची पडताळणी करणेत आली. आरोग्य विभाग, जि प सातारा अंतर्गत असे एकूण ५६२ उमेदवारांची कागदपत्र पडताळणी पुर्ण करणेत आली.

भरती प्रक्रिया ही पारदर्शक असून, या मध्ये कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार होणार नाही याची दक्षता घेणेत आली आहे. शासनाने घेतलेल्या या परिक्षेचे निकाल संबंधीत सर्व उमेदवारांना कळवण्यात आले आहेत.

# पुनर्रचनेद्वारे अण्णासाहेब पाटील विकास महामंडळाला बळकटी

**सातारा :** मराठा समाजाला कोणते परिस्थितीत आरक्षण मिळाले पाहिजे ही शासनाची भूमिका आहे. कायद्याच्या चौकटीत टिकणारे कल्याणकारी निर्णय शासन घेत आहे, मराठा समाजातील तरुणांनी नोकरी करण्यापेक्षा नोकरी देणारे व्हावे याकरता अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाची पुनर्रचना करण्यात आली आहे या मंडळाला कायदेशीर बळकटी दिल्यामुळे त्याचे कार्यक्षेत्र वाढले आहे असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी केले

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ व सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संयुक्त विद्यमाने एक लाख मराठा उद्योजक संकल्प कृती मिळावा जिल्हा परिषदेच्या स्वर्गीय यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते यावेळी महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, कृष्णा खोरे विकास महामंडळाचे उपाध्यक्ष महेश शिंदे, आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले, आमदार जयकुमार गोरे ,माढ्याचे खासदार रणजीतसिंह नाईक निंबाळकर, महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक अनिल पाटील, जिल्हा बँकेचे व्यवस्थापक राजेंद्र सरकाळे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, मुख्य कार्यकारी अधिकारी याशिनी नागराजन, पोलीस अधीक्षक समीर शेख, भाजपचे जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम यावेळी उपस्थित होते.

देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले एक लाख मराठा उद्योजक निर्माण करण्याचे काम महामंडळाने केले आहे ही बाब अभिनंदनीय आहे संपूर्ण महाराष्ट्रामध्ये महामंडळाचे कार्यक्षेत्र विस्तारले आहे. मराठा समाजात नोकरी देणारे उद्योग निर्माण करण्यासाठी महामंडळाचे पुनर्रचना केली आहे. बँकांच्या माध्यमातून साडेआठ हजार कोटींचा कर्ज पुरवठा करण्यात आला आहे. जवळपास ८२५ कोटी व्याज परतावा महामंडळाने दिला आहे.

# न्यायालयाने फेटाळला उज्वल निकम यांच्यावरील हरकतीचा अर्ज

## धोम वाई खून खटल्यातील मुख्य आरोपी संतोष पोळ याने घेतली होती हरकत

**सातारा :** ॲड. उज्वल निकम यांनी लोकसभेची निवडणूक सत्ताधारी पक्षाकडून लढवलेली असल्यामुळे ते सरकारी वकील म्हणून राहण्यास अपात्र आहेत. त्यामुळे त्यांना माझ्याशी संबंधित खटल्याचे काम काज चालविल्यास बंदी घालावी. हा खटला चालवण्यास माझी हरकत असल्याचे धोम वाई खून खटल्याचा मुख्य आरोपी संतोष पोळ याने न्यायालयाला केलेला अर्ज न्यायालयाने आज फेटाळून लावला.

धोम वाई खून खटल्याची सुनावणी वाई येथील विभागीय जिल्हा न्यायालयात जिल्हा न्यायालयाधीश न्या निकम यांच्यासमोर सुरू आहे. त्यासाठी संतोष पोळ याला न्यायालयात आणण्यात आले होते. यावेळी मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. सुनावणीसाठी सरकारी वकील ड उज्वल निकम सहाय्यक मिलिंद ओक उपस्थित होते.

ड उज्वल निकम यांनी लोकसभेची निवडणूक सत्ताधारी भारतीय जनता पक्षाकडून लढवलेली असल्यामुळे ते सरकारी वकील म्हणून राहण्यास अपात्र आहेत. त्यांना आता सरकारी वकील म्हणून कामकाज पाहण्यास न्यायालयाने बंदी करावी असा विनंती अर्ज या खटल्यातील मुख्य आरोपी संतोष पोळ याने न्यायालयाला केला होता. यावर पहिल्या सत्रात सुनावणी झाली. भारतीय संविधानाप्रमाणे कोणालाही कोणतीही निवडणूक लढविण्याचा अधिकार आहे. त्या अधिकारात मी निवडणूक लढविली आहे असे उज्वल निकम त्यांनी न्यायालयास सांगितले. यावर न्यायालयात दोन्ही वकिलांनी युक्तिवाद केला.

यानंतर संतोष पोळ याचा हरकत अर्ज फेटाळून लावला. या खटल्यातील साक्षीदार डॉ विद्याधर घोटवडेकर आणि त्यांची पत्नी हे भाजप आणि संघाचे कार्यकर्ते आहेत आणि उज्वल निकम यांनी भाजपाकडून निवडणूक लढवली आहे. त्यामुळे उज्वल निकम घोटवडेकर यांच्या बाजूने साक्ष घेतील व त्यांना निर्दोष सोडतील.

खटल्याच्या अनुषंगाने ते साक्ष घेणार नाहीत असे न्यायालयाच्या निदर्शनास आणण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या निवडणुकीचा या खटल्यावर मोठा परिणाम होईल असेही त्याने न्यायालयात सांगितले. त्यामुळे उज्वल निकम यांना या खटल्या अपात्र ठरवावे असेही पोळ याच्या वतीने न्यायालयास सांगितले. मात्र न्यायालयाने पोळ याच्यावर वेगवेगळ्या वेळी वेगळे आरोप करत असल्याबद्दल नाराजी व्यक्त करत त्याच्या वक्तव्याची गंभीर दखल घेत त्याचे सर्व आरोप फेटाळून लावले.

यावेळी माफीची साक्षीदार ज्योती मांढरे हिचा उलट तपासात उज्वल निकम यांनी घेतला. एका प्रश्नाचे उत्तर देताना न्यायालयात सांगितले की, तिने आणि संतोष पोळ याने दहा सिमकार्ड आलटून पालटून वापरली होती. यापुढे या खटल्याचे कागदोपत्री पुराव्याच्या आधारे कामकाज होणार आहे. संतोष पोळ याच्या वतीने ॲड. दिनेश धुमाळ यांनी काम पाहिले.

# वाई तहसीलदारांविरोधात १५ ऑगस्ट रोजी पसरणी ग्रामस्थांचे आंदोलन

**वाई** : महसूल विभागाकडून पसरणी नवाब बंगला रस्ता खुला करणे संबंधी कारवाई करणे अपेक्षित होते मात्र मागील २५ दिवसांमध्ये आपल्या विभागाकडून हा रस्ता खुला करणे संबंधी कोणतीही कारवाई करण्यात आली नाही असा आरोप पसरणी ग्रामस्थांनी केला.

याउलट ज्या शेतकऱ्यानी या रस्त्याची अडवणूक केली आहे त्याचा व त्याच्या हिस्स्यातील दुसऱ्या शेतकऱ्याचा चालू असणाऱ्या दाव्यामध्ये आमचे रस्त्याचे प्रकरण टाकून जेव्हा त्या प्रकरणाचा निकाल लागेल तदनंतरच या रस्त्यासंबंधी योग्य ती कारवाई करण्यात येईल अशी माहिती ग्रामस्थांना तहसीलदार यांच्याकडून संदर्भीय निवेदन देते समई देण्यात आली. मात्र आमचा विषय हा गाव नकाशा वरील वहिवाटीच्या रस्त्याच्या अनुषंगाने आहे आम्ही सदर रस्त्यासंबंधी सर्व कागदपत्र महसूल विभागाला मागील निवेदना सोबत दिलेली आहेत. सदर रस्ता गाव नकाशावर (ज्याचे पत्र भूमिअभिलेख विभाग यांनी दिले आहे) सदर रस्त्याची नोंद ग्रामपंचायत दप्तरी करण्यात आलेली आहे सदर रस्त्यावरती शासकीय निधी सुद्धा पडलेला आहे सदर रस्ता हा पूर्व परंपरेनुसार पसरणी गावचे ग्रामदैवत श्री काळभैरवनाथ यांची दसऱ्या दिवशी निघणाऱ्या पालखीचा रस्ता आहे. संबंधित अडवणूक करणाऱ्या शेतकऱ्याचा व त्याच्या विरुद्ध असणाऱ्या शेतकऱ्याच्या सुरू असणाऱ्या दाव्याचा जो काही निकाल लागेल त्याच्याशी गाव रस्त्याचा कोणताही संबंध नाही या सर्व गोष्टी वाई तहसीलदार यांच्या निदर्शनास आणून दिलेल्या असताना सुद्धा तहसीलदार या रस्त्या संबंधी योग्य कारवाई करण्याबाबत संवेदनशील नाहीत असे आमच्या निदर्शनास आले आहे. याउलट तहसीलदार न्यायप्रविष्ट प्रकरणांमध्ये आमचा विषय टाकून एकूण प्रकरण दिशाभूल करण्याचे काम करत आहात. आपल्या या कृतीमुळे या भागातील १०० एकर शेतीचे नुकसान होणार आहे त्याचबरोबर आमच्या जनावरांना चाऱ्यासाठी डोंगरामध्ये जाता येत नाही त्यामुळे चाऱ्याचा प्रश्न सुद्धा निर्माण झालेला आहे या सर्व गोष्टींसाठी व यामधून होणाऱ्या लाखो रुपयांच्या नुकसानासाठी तहसीलदार जबाबदार आहेत असे आमचे मत आहे. आमच्या गावाच्या शेजारील असणाऱ्या कुसगाव ग्रामपंचायतच्या हद्दीमधील बेकायदेशीर, नकाशा वरती नसणाऱ्या ग्रामपंचायत मध्ये कोणतीही नोंद नसणाऱ्या रस्त्याला खुला करण्याचे आदेश आपल्या तहसीलदार देऊ शकतात मात्र कायदेशीर रित्या योग्य असणाऱ्या आमच्या रस्त्याबाबत निर्णय घेत नाहीत.

त्यामुळे आपल्या महसूल प्रशासनाविरोधात आंदोलन का करू नये याचे आम्हाला लेखी उत्तर मिळावे अन्यथा आम्ही १५ ऑगस्ट रोजी आपल्या वाई महसूल विरोधात आंदोलन करणार हे आपणास या अर्जाद्वारे कळवित आहोत.

# देवस्थान इनाम शेतकऱ्यांची निदर्शने

**सातारा :** देवस्थान इनाम जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांची सातारा जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य निदर्शने करण्यात आली. यावेळी जमीन आमच्या हक्काची, नाही कुणाच्या बापाची, किसान सभा जिंदाबाद, देवस्थान शेतकऱ्यांना मिळालाच पाहिजे, अशा घोषणांनी परिसर दणानं सोडण्यात आला. यानंतर निवासी उपजिल्हाधिकारी राजेश पाटील यांना मागण्याची निवेदन देण्यात आले.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, देवस्थान कायद्यात बदल केल्याशिवाय काही करता येणार नाही. यानंतर झालेले सभेत कॉम्रेड माणिक अवघडे यांनी आपल्या भाषणातजमीन हा आमचा स्वाभिमान आहे व जगण्यासाठीची हक्काची भाकरी आहे. ती आम्ही सोडणार नाही, असा निर्धार आजच्या निदर्शनानिमित्त आपण करूया अशी आवाहन मालिका उघडे यांनी केले व पुढे सांगितले की कायद्यात बदल केल्याशिवाय कोणत्याही प्रकारे शेतकऱ्यांना बेदखल करता येणार नाही, अशी असताना देवस्थान शेतकऱ्यांची नावे इतर हक्कात टाकण्यात आली; त्यांच्या वारसा हक्काच्या नोंदी रोखल्या आहेत. देवस्थान जमिनीच्या खरेदी विक्री मोठ्या प्रमाणात होत आहे त्यांना कर्ज पुरवठा केला जात नाही या सर्व मागण्यासाठी आपण संघटित होऊन संघर्ष केला पाहिजे तसेच वारसा हक्काचे नोंदीसाठी त्याचे फॉर्म भरून त्वरित जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करण्यासाठी पुढील आंदोलन ठरेल त्यामध्ये आपण सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन माणिक अवघडे यांनी केले. या आंदोलनात शब्बीर मुलांणी, मनोज चाकणकर, शंकर शेटे, मुरुल मुल्ला, प्रवीण साळुंखे, संग्राम

# योगेवाडी – मणेराजुरी एमआयडीसीला १८ कोटींचा निधी

**तासगाव :** माजी गृहमंत्री स्व. आर. आर. पाटील यांचे स्वप्न असलेल्या योगेवाडी - मणेराजुरी 'एमआयडीसी' साठी बिगरशेती वाटपाच्या ०.४६५९ द.ल.घ.मी. पाण्याची मंजूरी जुलै महिन्यात मिळाली. शुक्रवारी (दि. ९) रोजी एमआयडीसी उभारणीसाठी सुमारे १८ कोटी रुपयांचा निधी मंजूर झालेला आहे. निधीतून एमआयडीसी मध्ये पायाभूत सुविधांचा विकास करण्यात येणार असल्याची माहिती राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे युवा नेते रोहित आर. आर. पाटील यांनी दिली आहे. लवकरच कामांना सुरुवात होणार असल्याचे रोहित पाटील यांनी सांगितले.



रोहित पाटील म्हणाले, १९९७ साली आमदार पतंगराव कदम आणि आमदार आर. आर. पाटील यांच्या प्रयत्नातून 'अलकुड - मणेराजुरी एमआयडीसी'ला मंजूरी मिळाली होती. तासगाव तालुक्यातील योगेवाडी, गव्हाण, मणेराजुरी तर कवठेमहांकाळ तालुक्यातील अलकुड एम, हरोली, बोरगाव आणि मळणगाव अशा सात गावातील १ हजार ४९५ हेक्टर क्षेत्रावर सदर एमआयडीसी प्रस्तावित होती.

११ वर्षांनंतर २००८ ला एमआयडीसी उभारणी प्रक्रियेला वेग आला. भूसंपादनाची प्रक्रिया सुरु होण्याच्या मार्गावर होती.अचानक एमआयडीसी विरोधात अपप्रचाराचे एक वादळ आले. बागायती जमीन जाणार,शेतीचे पाणी एमआयडीसीला देणार, अशा अपप्रचाराचे पेव फुटले. बहूतांशी गावांनी विशेष ग्रामसभा घेऊन एमआयडीसीला विरोध केला. यामुळे आर. आर. पाटील यांनी भू -संपादनाचे काम थांबविण्याचे आदेश दिले होते.

२०१४ साली राज्यात महायुतीचे सरकार आले. २०१५ साली आर. आर. पाटील यांच्या निधनानंतर एमआयडीसी रद्द होण्याच्या मार्गावर होती. परंतू आमदार सुमन पाटील आणि मी मात्र आशा सोडलेली नव्हती. विरोध असलेली गावे वगळून मिनी एमआयडीसी उभी करण्यासाठी निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी तत्कालीन उद्योग राज्यमंत्री आदिती तटकरे यांचेकडे केली होती.

एमआयडीसी उभी करण्यासाठी तातडीने सर्व्हे करा आणि अहवाल पाठवा असे आदेश उद्योग राज्यमंत्री आदिती तटकरे यांनी प्रादेशिक अधिका-यांना दिले होते.तसा अहवाल पाठविण्यात आला. 'एमआयडीसी' ने अहवाल राज्य सरकारला पाठविल्यानंतर आम्ही शिंदे - फडणवीस यांच्या सरकारकडे पाठपुरावा केला.

आमच्या अविरत प्रयत्नामुळे सदरच्या योगेवाडी - मणेराजुरी एमआयडीसीला टेंभू उपसा सिंचन योजनेचे बिगरशेती वाटपाचे ०.४६५९ द.ल.घ.मी.पाणी देण्याची मागणी १९ जुलै रोजी जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता हणमंत गुणाले यांनी मंजूर केली आहे. त्यानुसारच योगेवाडी - मणेराजूरी या औद्योगिक क्षेत्रास पाणी पुरवठा करणेसाठी टेंभू उपसा सिंचन योजनेतुन पिण्यासाठी ०.०९३२ दलघमी व औद्योगिकरणासाठी ०.३७२७ दलघमी असे एकुण ०.४६५९ दलघमी बिगर सिंचन पाणी आरक्षण मंजूर करण्यात आले. रोहित पाटील म्हणाले, २९ सप्टेंबर २०२२ रोजी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाच्या ३९३ व्या बैठकीमध्ये ठराव क्रमांक ६४५१ अन्वये योगेवाडी - मणेराजुरी मिनी एमआयडीसी च्या औद्योगिक क्षेत्रातील भूखंड वाटपाचा दर निश्चित करण्यात आला आहे. भूखंड वाटप करताना औद्योगिक दर, निवासी दर आणि व्यापारी दर या तीन प्रकारांमध्ये भूखंडांचे दर निश्चित केलेले आहेत. पायाभूत सुविधांचा विकास झालेनंतर लवकरच एमआयडीसी मधील भूखंडांचे वाटप केले जाणार आहे.

# विधानसभेसाठी काँग्रेसने रणशिंग फुंकलं

**जळगाव :** महाविकास आघाडीमधील सहभागी इतर घटक पक्षांसोबत वाटाघाटी करण्यासाठी काँग्रेस पक्षाने दोन समित्या स्थापन केल्या आहेत. मुंबई शहरासाठी देखील तीन नेत्यांची स्वतंत्र समिती आहे. उर्वरित महाराष्ट्रासाठी स्थापन झालेल्या समितीचे नेते १० ऑगस्टपासून राज्याचा दौरा करणार आहेत. विधीमंडळातील नेते बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार व माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण जळगाव जिल्हा दौऱ्यावर येणार आहेत.

महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाने लोकसभा निवडणुकीत जोरदार मुसंडी मारत पहिल्या क्रमांकाच्या पक्षाचे स्थान मिळवले. विधानसभेतही पहिल्या क्रमांकावरच येण्यासाठी काँग्रेसने कंबर कसली आहे. राष्ट्रीय सरचिटणीस के.सी.वेणुगोपाल यांनी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस व मुंबई प्रादेशिक काँग्रेस समिती स्थापन केलेली आहे. या समितीमधील नेते महाविकास आघाडीमधील सहभागी इतर घटक पक्षांसोबत वाटाघाटीत सहभागी होतील व अंतिम निर्णय दिल्लीला कळवतील. याच नेत्यांना महाराष्ट्र पिंजून काढण्याचे आदेश देण्यात आले असून १० ऑगस्टपासून दौऱ्याची आखणी करण्यात आली आहे.

जळगाव जिल्ह्यात काँग्रेसने ११ जागांसाठी तयारी केलेली असली तरी महाविकास आघाडीत ठरलेला निर्णयच अंतिम राहणार आहे. आम्ही आमचा अहवाल पक्ष श्रेष्ठींना सादर केलेला आहे, अशी माहिती जिल्हाध्यक्ष प्रदीप पवार यांनी दिली.

अशा आहेत समित्या

महाराष्ट्र प्रदेश कमिटीत प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार, पृथ्वीराज चव्हाण, डॉ.नितीन राऊत, अरिफ नसीम खान व सतेज उर्फ बंटी पाटील यांचा समावेश आहे तर मुंबईसाठी स्थापन झालेल्या कमिटीत वर्षा गायकवाड, अशोक उर्फ भाई जगताप व अस्लम शेख यांचा समावेश आहे.

## शासनाने लहान, मोठ्या सहकारी पाणी पुरवठा संस्थांचे वीज बील माफ करावे : ताकवणे

**दौंड :** राज्यात असंख्य लहान मोठ्या सहकारी पाणीपुरवठा संस्थांचे वीज बील विना विलंब त्वरीत पुर्णपणे माफ करण्याची मागणी दौंड कांग्रेस चे जेष्ठ नेते आणी दौंड बाजार समिती संचालक भाई ताकवणे यांनी निवेदनाद्वारे मुख्यमंत्री यांचे कडे केली आहे.

या निवेदनात पुढे म्हटले आहे की, शासनाने शेतकरी बांधवांचे विजेच्या मोटारींचे विज बिल माफ केलेले आहे. यामध्ये साडेसात हार्स पावर पर्यंतच विज बिल माफ हीअट घातल्याने अनेक शेतकरी या लाभापासुन वंचित राहणार आहेत.

उदाहरण शेतकरयांनी चार सहा जणांनी एकत्र येऊन किमान दहा एच. पी. क्षमतेच्या पुढील विज पंप वापरुन लाखो रुपये कर्ज काढुनी पांणी योजना केलेल्या आहेत.समजा दहा शेतकऱ्यांनी विस एच. पी. क्षमतेची एक मोटार वापरत असतील तर त्या योजनेत प्रत्येक शेतकऱ्याच्या हिशयाला दोन एच.पी. येतात. अशा योजनांना विज माफीचा लाभ हा रितसर मिळणे आवश्यक आणी रास्त आहे.अशा प्रकारच्या राज्यात किमान सहा सात ते पुढे सत्तर ऐंशी ते पुढे शंभर पर्यंत शेतकरी बांधव एकत्र येऊन त्यांनी आपली शेती जमीन तारण ठेऊन लाखो रुपये बँकेचे कर्ज काढुन स्वखर्चाने सहकारी पाणीपुरवठ्याची योजना या केलेल्या आहेत.

या योजनांचे वीज पंप हे जास्त एच.पी.चे असले तरी त्या योजनेत सहभागी सभासद संख्या आणि एच.पी. चे प्रमाण जर प्रत्येक शेतकरी बांधवास किमान पाच एच.पी. असे येणारया म्हणजे च मोठ्या पाणी पुरवठा योजना यांना ही वीज बिल माफी लाभ हा मिळणं रास्त आणी आवश्यक आहे.

# महागणपती मंदिरात विनायकी चतुर्थी निमित्त विविध धार्मिक कार्यक्रम

**रांजणगाव :** अष्टविनायकापैकी एक असलेल्या श्री क्षेत्र रांजणगाव गणपती, ता. शिरुर येथील महागणपती मंदिरात विनायकी चतुर्थी निमित्त विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले.

आज विनायकी चतुर्थी निमित्त पहाटे ५ वाजता अभिषेक तर सकाळी ७ वाजता गणेश याग आणि १० वाजता सत्यविनायक पूजा देवस्थान ट्रस्टच्या अध्यक्षा स्वाती पाचुंदकर व राजमुद्रा पतसंस्थेचे अध्यक्ष दत्तात्रय पाचुंदकर यांच्या हस्ते झाला. विनायकी चतुर्थी निमीत्त दुपारी १२ वाजता मुख्य विश्वस्त ओमकार देव यांच्या हस्ते महापूजा करण्यात आली.तसेच महागणपतीस माजी मुख्य विश्वस्त कै.वसंतराव देव यांच्या प्रित्यर्थ महागणपतीस १००१ संत्र्यांचा महानैवेद्य तसेच गणेशभक्त राजेंद्र नवले यांच्या वतीने फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती.येथील प्रगतशील शेतकरी आनंदराव पाचुंदकर पाटील यांच्या वतीने विनायकी चतुर्थी निमित्त भाविक भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन केले होते, अशी माहिती देवस्थान ट्रस्टच्या अध्यक्षा पाचुंदकर यांनी दिली.



**रांजणगाव गणपती, ता.शिरुर येथील श्री महागणपतीला विनायक चतुर्थीनिमित्त फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली.**

यावेळी देवस्थानचे मुख्य विश्वस्त डॉ.ओमकार देव, अध्यक्षा स्वाती पाचुंदकर, उपाध्यक्ष संदिप दौंडकर, सचिव डॉ.तुषार पाचुंदकर, खजिनदार विजय देव आदीसह भाविक व ग्रामस्थ उपस्थित होते.

# जैव वैविध्य,आदिवासी परंपरा,जीवनशैली यांची झलक

**पुणे :** तेरे पॉलिसी सेंटर, ग्लोबल नेचर फंड (जर्मनी), ग्राम पंचायत(कोडित) यांच्या संयुक्त विद्यमाने उभारण्यात आलेल्या 'धरा' या आदिवासी संग्रहालयाचे उदघाटन पुण्याच्या माजी नगरसेविका वर्षा तापकीर,तेरे पॉलिसी सेंटरच्या संस्थापक डॉ.विनिता आपटे,श्रीनाथ शिक्षण प्रसारक मंडळचे अध्यक्ष भैय्यासाहेब खैरे,कोडीत गावचे सरपंच विशाल कांबळे, माजी सरपंच प्रसाद खैरे यांच्याहस्ते करण्यात आले. सुनील बारस्कर,ग्रामसेविका सौ. नवले,कोडीत आणि आसपासच्या गावचे गावकरी तसेच तेर पॉलिसी सेंटर चे स्वयंसेवक उपस्थित होते. जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधून 'धरा' या संग्रहालय चे उद्घाटन करण्यात आले.



भारतातील विविध राज्यातील आदिवासी जीवनशैली ,परंपरा,अन्नधान्य,वृक्षसंपदा ,उत्सव,अलंकार यांची माहिती आणि छायाचित्रे या प्रदर्शनात मांडण्यात आली आहे.त्यासाठी बांबूची सजावट असलेले प्रदर्शन कक्ष खास तयार करण्यात आला आहे.या प्रकल्पात ५० हजार हुन अधिक झाडे लावण्यात आली असून पाणी अडविण्यासाठी बंधारा बांधण्यात आला आहे.

यावेळी बोलताना वर्षा तापकीर म्हणाल्या, 'ऑक्सिजन मिळत नाही तेव्हा झाडांचे महत्व आपल्याला पटते. ऑक्सिजन संपण्याची वेळ येऊ नये म्हणून पर्यावरण रक्षणाचे प्रयत्न करीत राहिले पाहिजे. 'तेर पॉलिसी सेंटर' ने केलेले वृक्षारोपण त्यादृष्टीने महत्वाचे आहे.पर्यावरण संवर्धनाच्या कामात सामूहिक योगदान उपयुक्त ठरणार आहे.

तेर पॉलिसी सेंटर च्या प्रमुख डॉ विनीता आपटे म्हणाल्या,' पश्चिम घाटातील जैव वैविध्य ,आदिवासी परंपरा,जीवनशैली यांची झलक या आदिवासी संग्रहालयात पाहायला मिळत आहे.

निसर्ग, पर्यावरण आणि माणसांचे पर्यावरण पूरक संवर्धन,हा उद्देश आहे. या प्रकल्पात इथे झाडे लावली गेली आहेत.पाणी अडवले गेले आहे.अनिर्बंध विकास करण्याऐवजी पर्यावरणपूरक विकास आणि पर्यावरण पूरक जीवनशैली विकसित होणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने या प्रकल्पात लोकसहभाग मिळविण्यातही आम्हाला यश आले आहे.

# रायगडमध्ये महायुतीत सत्तासंघर्षाची लढाई?

**रायगड :** जिल्ह्यात सध्या महायुतीमध्ये बिनसल्याचे सूर उमटत आहेत. रायगड जिल्ह्यात विधानसभेचे सर्वचे सर्व सात आमदार हे महायुतीचे आहेत. मात्र जसजशा विधानसभेच्या निवडणुका जवळ येत आहेत तसतसे महायुतीतील अंतर्गत वाद बाहेर येताना पहायला मिळत आहेत. कर्जत खालापूर तसेच अलिबाग मुरूड या मतदारसंघांमध्ये तो वाद आतापासूनच उफाळून आल्याचं चित्र आहे.

कर्जत खोपोली खालापूरचे आमदार महेंद्र थोरवे यांची सुद्धा आमदारकीची पहिलीच टर्म आहे. शिवसेनेच्या जोरावर त्यांना त्यांच्या मतदारसंघात जनतेने निवडून दिले त्यावेळी एकच ठाकरेंची शिवसेना होती. मात्र सेनेची दोन गटात विभागणी झाल्यानंतर महेंद्र थोरवे यांच्या मतदारसंघात सुद्धा राजकीय कलह पाहायला मिळाला.

राष्ट्रवादीचे माजी आमदार आणि सध्या भाजपमध्ये गेलेले सुरेश लाड यांचा त्यांनी १८ हजार ४६ मतांनी पराभव करत



विजयाची माळ आपल्या गळ्यात घातली होती. त्यांनतर राष्ट्रवादी पक्षात मोठी फूट पडली आणि सुरू झाला वादाचा दुसरा अंक. एकेकाळी शत्रू असलेले शिवसेना आणि राष्ट्रवादी हे दोन्ही पक्ष आता महायुतीमध्ये सामील आहेत. मात्र विधानसभेच्या निवडणुका पाहता कोणाला उमेदवारी मिळणार यावरून चुरस सुरू आहे.

राष्ट्रवादी आणि शिवसेनेनं नेहमीच एकमेकांविरोधात या मतदारसंघात लढाई केली आहे. त्यामुळेच अगोदरच गुडघ्याला बाशिंग बांधून आमदारकीची निवडणुक लढवण्याच्या तयारीत असलेले सुधाकर घारे यांनी केलेली थोरवे यांच्या विरोधातील भाषणे किंवा शक्तिप्रदर्शन हे नेहमीच चर्चेचा विषय बनला. यावरून आता या दोघांमध्ये कोणाला उमेदवारी मिळेल याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. तर भाजपमध्ये गेलेले माजी आमदार सुरेश लाड यांनी सुद्धा या मतदारसंघाचा दांडगा अनुभव असल्याने कदाचित ते सुद्धा निवडणुकीसाठी इच्छुक असू शकतात. त्यांच्यासाठी भाजप कोणता विचार करेल हे महत्वाचे ठरणार आहे.

अलिबाग मुरुड मतदारसंघ

अलिबाग मतदारसंघात सुद्धा एकंदरीत अशीच परिस्थिती आहे. विद्यमान आमदार महेंद्र दळवी यांनी शेकापच्या सुभाष उर्फ पंडित पाटील यांना ३२ हजार ९२४ मतांनी पराभूत केलं आणि हा गड शिवसेनेच्या ताब्यात आणून दिला. मात्र सत्तांतर झाल्यानंतर आता महेंद्र दळवी हे महायुतीमध्ये शिंदे यांच्या शिवसेनेत आहेत. मात्र त्यांना या मतदारसंघात भाजप आव्हान देत असल्याचं पहायला मिळत आहे.

शेकापमधून भाजपमध्ये गेलेले माजी सभापती दिलीप भोईर यांनी चक्क आमदारकी लढवण्याची तयारी दाखवली आहे. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख राजा केनी यांनी तर भोईर यांना माकड चाळे बंद करा असं म्हणत टीका केली आणि नव्या वादाला तोंड फोडलं.

यामुळे पेटून उठलेले भाजपचे दिलीप भोईर यांनी राजा केनी यांची भरसभेत कुंडलीच काढली. राजा केनी हे मी जिल्हा परिषदेवर सभापती असताना चोऱ्या करायचे अशी टिका त्यांनी केली. त्यामुळे येत्या काळात राजा केनी विरुद्ध दिलीप भोईर असा वाद रंगण्याची चिन्हे आहेत. या वादात आमदार महेंद्र दळवी यांची उमेदवारी धोक्यात येण्याची शक्यता आहे. कारण शिवसेनेच्या उपनेत्या शीतल म्हात्रे यांनी अलिबाग येथे पार पडलेल्या शिंदे गटाच्या आढावा बैठकीत शेकापच्या जयंत पाटील यांना काळ्या नागाची उपमा देत त्यांच्यावर टीका केली होती. यामुळे अगोदरच शेकाप विरूद्ध शिवसेना महेंद्र दळवी असा वाद असताना त्यात म्हात्रे यांचे जयंत पाटील यांच्यावरील टिकास्त्र पुनः नव्या वादाला तोंड फोडणारं ठरलंय. याचा फायदा कदाचित दिलीप भोईर यांना होऊ शकतो.

दिलीप भोईर हे शेकापमधून नुकतेच भाजपमध्ये गेलेले नेते आहेत. त्यामुळे शेकाप एकवेळ भोईर यांना बाहेरून मदत करू शकते. महेंद्र दळवी यांना पाडण्यासाठी पुन्हा शेकाप कंबर कसून बसल्याचं बोललं जातंय. विधानपरिषद निवडणुकीत शेकापचे जयंत पाटील पराभूत झाल्यानंतर स्वतः आमदार महेंद्र दळवी चिखलात लोळले होते. त्यामुळे अलिबाग मुरुड मतदारसंघात वेगळेच वारे वाहू लागलं आहे. त्यामुळे ऐनवेळेला या मतदारसंघातून कोणत्या पक्षाचा कोण उमेदवार असेल हे आता तरी सांगणे कठीण आहे.

# चित्रकला कार्यशाळेतून झाले आनंदी शिक्षण

## 'प्रतिमा उत्कट रंग कथा- २४' या चित्र प्रदर्शनातील उपक्रम

**पुणे :** ज्ञानप्रबोधिनी माजी विद्यार्थी मंडळाच्या कला व संस्कृती विशेष उद्दिष्ट गटातर्फे 'आर्टिस्ट कट्टा'च्या सहकार्याने आयोजित 'प्रतिमा उत्कट रंग कथा- २४' या चित्र प्रदर्शनात आज,शनिवार, दि. १० ऑगस्ट रोजी अस्मिता अत्रे यांची वंचित तसेच कर्णबधीर विद्यार्थ्यांसाठी चित्रकला कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती . ज्ञान प्रबोधिनीचा 'आनंदी शिक्षण' हा मूलभूत साक्षरतेवरील प्रकल्पामधील विद्यार्थी सहभागी झाले. या सर्वांना ज्ञान प्रबोधिनीचे सहकार्यवाह आशुतोष बारमुख यांच्या हस्ते प्रमाणपत्रे देण्यात




आली. ज्ञानप्रबोधिनी शैक्षणिक साधन केंद्राच्या पल्लवी पराडकर , कला व संस्कृती विशेष उद्दिष्ट गटाचे मिलिंद संत,श्रीनिवास देसाई ,पूर्णिमा पारेख उपस्थित होते.

'आनंदी शिक्षण' या प्रकल्पात १ ली ते ५ वी ची नागरी वस्ती, ग्रामीण, आदिवासी, कर्णबधिर अशी १००० पेक्षा अधिक मुले ५२ केंद्रात शिकत आहेत. त्यात डिजिटल आणि प्रत्यक्ष साधने व उपक्रम यातून शिक्षण घेतले जाते.स्किल टेक साई सर्व्हिस फाउंडेशन,व्ही आर व्ही एशिया पॅसिफिक प्रा.लि .,चार्ट इंडस्ट्रीज कंपनी, प्रेसिएन्ट टेक्नॉलॉजी प्रा.लि . ब्लूम कंबशन इंडिया प्रा.लि . यांचे सहकार्य या प्रकल्पाला लाभल्याची माहिती ज्ञानप्रबोधिनी शैक्षणिक संशोधन केंद्राच्या पल्लवी पराडकर यांनी दिली.

रविवार, ११ ऑगस्ट रोजी जलरंगातील पोर्ट्रेट चे प्रात्यक्षिक अमित ढाणे सकाळी दहा वाजता सादर करणार आहेत .दुपारी दोन वाजता स्पॉट पेंटिंग चे सामूहिक प्रात्यक्षिक होणार आहे. समारोपाचा कार्यक्रम सायंकाळी सहा वाजता होणार आहे.



**या मोकाट गाईंना कोण आवरणार ?** अनेक नामवंत व्यापाऱ्यांच्या गाई मोकाट पद्धतीने सोडून दिलेल्या असतात. सकाळ झाली की त्या रस्त्यात येत असतात, फिरून रस्त्यात वाहतुकीला अडथळा तर ठरतातच मात्र संध्याकाळ झाली की त्या पुन्हा आपल्या मालकाच्या घरी परततात .त्यामुळे पालिकेने अशा मोकाट गाईंवर योग्य ती कार्यवाही करत या रस्त्यात वारंवार होणाऱ्या वाहतूक कोंडीला पूर्ण बंद करण्यासाठी अशा मोकाट गाईंना कोंडवाड्यात नेऊन कोंडावे अशी मागणी सातारकर करत आहेत.